**राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदाकरीता प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीसाठी अटी व शर्ती निश्चित करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. साप्रवि-१२०२२/१६/२०२६-साप्रवि/माहिती (कक्ष-६ )**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. २७ एप्रिल, २०२६

**संदर्भ** :- १. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
२. सा.प्र.वि.शासन निर्णय क्र.-१२०२२/५/२०२४ साप्रवि (कक्ष-६) दि.०७.०१.२०२५.

**प्रस्तावना :-**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५(३) नुसार राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांची नियुक्ती माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीच्या शिफारशीवरून करण्यात येते. तसेच कलम १५(५) नुसार अशा नियुक्तीसाठी विचाराधीन व्यक्ती ही सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा असलेली व कायदा, प्रशासन, पत्रकारिता, सामाजिक सेवा, विज्ञान व तंत्रज्ञान, व्यवस्थापन अथवा तत्सम क्षेत्रांमध्ये व्यापक ज्ञान व अनुभव असलेली असणे अपेक्षित आहे.

२. माननीय सर्वोच्च न्यायालयाने अंजली भारद्वाज विरूद्ध भारत सरकार व इतर (रिट पिटीशन- सिव्हील क्र.४३६/२०१८, आदेश दि.१५.०२.२०१९) तसेच त्यानंतरच्या आदेशांद्वारे माहिती आयुक्तांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता, वस्तुनिष्ठता व गुणवत्ताधारित निवड सुनिश्चित करण्यासाठी पात्रता निकष, छाननीची पद्धत व निवड प्रक्रियेची चौकट पूर्वनिश्चित करून सार्वजनिक करणे आवश्यक असल्याचे निर्देश दिले आहेत.

३. सदर न्यायालयीन निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी २०२५ अन्वये उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली मुख्य सचिव व अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग हे सदस्य असलेली शोध व छाननी समिती स्थापन केली आहे. सदर समितीस रिक्त पदांसाठी प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीतील पात्रता निकष, अटी व शर्ती निश्चित करणे, अधिनियम व न्यायालयीन निर्देशांशी सुसंगत निवड प्रक्रिया सुनिश्चित करणे, अर्जदारांच्या वस्तुनिष्ठ छाननीसाठी निकष ठरविणे व आवश्यक शिफारशी करणे असे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

४. राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त या पदाकरीता प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीसाठी अटी व शर्ती निश्चित करणेबाबत उपरोक्त समितीची दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या निवडीसाठी जाहिरातीत समाविष्ट करावयाच्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या असून त्या शासन निर्णयाद्वारे प्रसिद्ध करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णय दिनांक ७ जानेवारी, २०२५ अन्वये गठीत केलेल्या शोध समितीच्या दि.२४.०४.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये समितीने घेतलेल्या निर्णयानूसार राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत :-

**१.मूलभुत पात्रता** :- अर्जदार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १५(५) अन्वये सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा असलेला असावा. त्यास कायदा, प्रशासन, पत्रकारिता, सामाजिक सेवा, विज्ञान व तंत्रज्ञान व व्यवस्थापन या पैकी एक किंवा अधिक क्षेत्रांमध्ये ज्ञान असणे आवश्यक राहील.

**२.किमान अनुभव** : अर्जदारास उपरोक्त पैकी एक किंवा अधिक क्षेत्रांमध्ये राज्य मुख्य माहिती आयुक्त या पदांसाठी किमान २० वर्ष व राज्य माहिती आयुक्त या पदांसाठी किमान १५ वर्षाचा अनुभव असावा. शासन , निम-शासकीय , स्वायत्त संस्था, सार्वजनिक क्षेत्र, नामांकित खाजगी क्षेत्र व सामाजिक / धर्मादाय संस्थांमध्ये वरिष्ठ पदावरील अनुभवास प्राधान्य देण्यात येईल.

**३.वयोमर्यादा :-** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किमान वय ४५ वर्षे व कमाल वय ६३ वर्ष इतके असावे.

**४.शिक्षण :-** अर्जदार हा कोणत्याही शाखेतील किमान पदवीधर असावा.

**५.आवश्यक कौशल्ये :-** अर्जदाराकडे माहितीचा अधिकार अधिनियम व संबंधित कायद्यांचे ज्ञान. अर्ध-न्यायिक कार्यपद्धतीची जाण, पारदर्शकता, उत्तरदायित्व व सुशासन या मूल्यांप्रती बांधिलकी, प्रशासकीय नेतृत्व व निर्णयक्षमता असावी.

**६.अर्ज सादरीकरणाशी संबंधित अटी** :- अर्ज निर्धारित नमुन्यात सादर करणे आवश्यक राहील, सविस्तर बायोडेटा, अनुभव विवरण, कार्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

**७.अर्जासाठी शुल्क :-** अर्ज सादर करतांना त्यासोबत रू.१०००/- इतके शुल्क देय राहील. माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे शुल्क भरण्याच्या ज्या पद्धती आहेत त्यापैकी कोणत्याही पद्धतीने शुल्क भरून त्याची पावती अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

**८.शपथपत्र :-** अर्जदाराने त्याच्याविरूद्ध कोणताही गुन्हा नोंद नसल्याचे, फौजदारी खटला प्रंलबित नसल्याचे व शासकीय निम-शासकीय सेवेत असल्यास शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रंलंबित अथवा प्रस्तावित नसल्याचे शपथपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

५. सदर सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४२७१७२०२०६००७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by ATUL NILKANTHRAO PATNE
Date: 2026.04.27 17:21:49 +05'30'

**(डॉ.अतुल पाटणे)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत:-

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानभवन, महाराष्ट्र राज्य
४. मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. न्यायमुर्ती श्री. सुनिल बी. शुक्रे (सेवानिवृत्त), मा. उच्च न्यायालय, मुंबई.
६. सचिव, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, नोर्थ ब्लॉक, सेंट्रल, सेक्रेटरिएट, नवी दिल्ली.
७. राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. सर्व राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
१०. अप्पर मुख्य सचिव (प्र.ना.उ.व सु.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई
१२. निवड नस्ती, कार्या-सहा